खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता.खेड, जि.पुणे 410505

भूगोल विभाग

**वार्षिक अहवाल २०२५ – २६**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये भूगोल विषय सामान्य तसेच विशेष स्तरावर शिकविला जातो. महाविद्यालयात भूगोल विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयात भूगोल विषय प्रथम वर्ष कला आणि वाणिज्य या वर्गासाठी सामान्यस्तरावर तर द्वितीय व तृतीय वर्ष कला या वर्गासाठी विशेष स्तरावर भूगोल विषयाचे अध्यापन केले जाते. शैक्षणिक वर्ष 2025 – 26 साठी प्रथम वर्षासाठी 324 विद्यार्थ्यांनी एनईपी 2020 च्या अभ्यासक्रमानुसार नोंदणी केली. एस. वाय. बी. ए. या वर्गासाठी 34 तर टी. वाय. बी. ए. साठी 45 विद्यार्थ्यांनी विभागामध्ये प्रवेश घेतला. विभागात टी. वाय. बी. ए. च्या विद्यार्थ्यांनी एस. वाय. बी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन केले. विभागामध्ये भूगोल मंडळाच्या उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी वर्षभरामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सहली, क्षेत्रभेटी, सर्वेक्षण विषयक कार्यशाळा, चर्चासत्रे, सेमीनार, मातीपाणी परीक्षण कार्यशाळा, वर्ग चाचणी परीक्षा, एआय उपयुक्तता कार्यशाळा, नकाशे निर्मिती, सराव परीक्षा, स्पर्धा परीक्षा विषयक मार्गदर्शन, निबंध स्पर्धा, लेखन कौशल्य विकसन कार्यशाळा, तज्ञ व्याख्याते मार्गदर्शन आणि गाव सर्वेक्षण असे एकूण 15 हून अधिक कार्यक्रम संपूर्ण वर्षभरामध्ये आयोजित करण्यात आले.

महाविद्यालाच्या वेबसाईटवर तसेच गुगल क्लासरूमवर विभागाकडून एस. वाय. बी. ए. साठी एनईपीनुसार शैक्षणिक साहित्य अपलोड करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकांची माहिती पीपीटीच्या साहयाने देण्यात आली. प्रा. एम. एल. मुळूक यांनी विद्यार्थ्यांना भूमापनासंदर्भातील सर्वेक्षणाचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामध्ये विभागातील सर्व विद्यार्थी सहभागी झालेले होते. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना लोलकीय होकायंत्र सर्वेक्षण, समतलफलक सर्वेक्षण, डंपी लेव्हल सर्वेक्षण, थेडोलाईट सर्वेक्षण, या उपकरणांचे प्रशिक्षण दिले.  विभागातील विद्यार्थ्यांसाठी दोन शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आले. तसेच बुरसेवाडी या गावाचे ग्रामसर्वेक्षण करून

त्याचा डिजीटल अहवाल तयार करण्यात आला. विभागातील प्राध्यापक विविध ठिकाणी आयोजीत करण्यात आलेल्या चर्चासत्रात सहभागी होऊन शोधनिबंधाचे वाचन केले. प्रा. दिलीप मुळूक यांची सात क्रमिक पुस्तके तर डॉ. डी. मारकड यांची चार क्रमिक पुस्तके प्रकाशित झाली. डॉ. दिलीप मुळूक यांचे एक पेटंट प्रकाशित झाले

प्रा. डॉ. दिलीप मुळूक
भूगोल विभाग प्रमुख